**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - ०९/०२/२०२३

**दि.०८/०२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ०९/२०२३ भादवी कलम ३९२, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०७/०२/२०२३ रोजी २२/१५ वाजता
मौजे आंबेठाण ता.खेड जि पुणे गावच्या हद्दीत आयोध्यानगरी जवळील प्लॉटींग मधील मोकळया जागेत

गुन्हा दाखल :- दि.०८/०२/२०२३ रोजी ०४/१६ वा.

फिर्यादी :- दिवेश श्रीनाथ भाडळे , वय २३ वर्षे, धंदा - हॉटेल , रा. सध्याचा पत्ता - घाटेवस्ती आंबे्ठाणताखेड जि पुणेमुळचा पत्ता - रा. कोयाळी पो. खेड ताखेड

आरोपी :- अज्ञात चोरटे इसम

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे हॉटेल बंद करुन त्यांच्या ताब्यातील टि.व्ही.एस अपाचे मोटार सायकल नंबर MH-02/FC-0670 ही घेऊन आयोध्यानगरी आंबेठाण ता.खेड जि पुणे जवळील प्लॉटींग मधुन कच्च्या रस्त्याने घरी जात असताना दोन अज्ञात इसमांनी समोरुन येवुन त्यांनी फिर्यादी यांची गाडी थांबवुन पेट्रोलची मागणी केली. फिर्यादी यांनी पेट्रोल देण्यास नकार दिल्याने आरोपींनी फिर्यादी यांच्या गाडीची चावी काढुन घेवुन फिर्यादी बरोबर झटापट करुन फिर्यादीस कसल्यातरी हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादी यांचे गळयातील ७५,०००/- रु किं ची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व ६०,०००/- रु किं ची १२ ग्रॅम वजनाची बोटातील सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढुन घेवुन चोरुन नेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गोसावी ९८८१५९५८९१

२.

पोस्टे व गु.रजि.नं. :- भोसरी एमआयडीसी ४५/२०२३भा द वि कलम ३९२ ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ०७/०२/२०२३ रोजी २३/५० वा.चे सुमारास मोशी आळंदी नवीन बी.आर.टी.रोड, सस्तेवाडी मोशी पुणे येथील चौधरी ढाब्या समोर

गुन्हा दाखल :- दि.०८/०२/२०२३ रोजी०३/२३ वाजता

फिर्यादी :- संजय भऊलाल गडकर, वय ३९ वर्षे,रा. सी.ओ राम हरी गायकवाड यांची चाळ, चंदन मेडीकल मागे, गायकवाड वस्ती, मोशी ता.हवेली, जि.पुणे

आरोपी :- स्विप्ट कार क्र. एम.एच. १४/एच.जी.३२७० मधील दोन अनोळखी इसम
**आरोपी निष्पन्न-**
१)योगेश आत्माराम घाटुळकर वय २४ वर्षे रा मुपो केळगाव आळंदी ता खेड जि पुणे
२) माधव पंढरी ताले वय २६ वर्षे रा साई मंगल कार्यालय आळंदी पोस्ॉ ऑफीसजवळ आळंदी ता खेड जि पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे मोशी आळंदी नवीन बी.आर.टी.रोड, सस्तेवाडी मोशी पुणे येथील चौधरी ढाबा समोरील सार्वजनिक रोडवर मोटरसायकलवर थांबुन फोनवर बोलत असताना स्विप्ट कार क्र. एम.एच.१४/एच.जी ३२७० मधील दोन अनोळखी इसमांनी कारमधुन खाली उतरुन त्यांचे जवळ जावुन त्यांना इथे काय करतो, आम्ही काय बोलतो याकडे लक्ष देता येत नाही का असे म्हणुन फिर्यादींना हाताने मारहाण करुन त्याचे गळयातील ०४ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन किंमत रुपये २०,०००/- व खिशातील रोख रक्कम

६०००/-रुपये असे एकुण २६,०००/-रुपये किं चा माल जबरदस्तीने काढुन घेतले आहे म्हणुन

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउनि चव्हाण मोनं ९५५२५२६६३५ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | शिरगाव ३६/२०२३ भा.द.वी कलम ३५४(ड),लैंगिकअपराध बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११(४),१२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ता. ०८/०२/२०२३ रोजी १२/३० वा.चे सुमारास शिरगाव ता मावळ जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०८/०२/२०२३ रोजी २२/३९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय १७ वर्षे |
| आरोपी | :- | अमोल भोसुरे धानोरी ता.शिरूर जि.पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचे राहते घरी असताना फिर्यादी यांची चुलत बहीण हीने फिर्यादीचे घरी येवुन सांगितले की, माझे नावाने असलेले इन्स्टाग्राम अंकाउटवर नमुद आरोपी यांने मॅसेज केला आहे. व त्यामध्ये फिर्यादी नामे हीला मला फोन करायला सांग असे लिहले आहे.त्यानंतर फिर्यादीने त्यांची चुलत बहीण हिचे मोबाइल फोन वरून यातील आरोपी याचे इस्टाग्राम अकाउट उघडुन पाहिले असता त्यामध्ये आरोपी याने फिर्यादीचा फोटो तसेच बाजुला त्याचे फोटो असे फिर्यादीच्या वाढदिवसाचे अनेक फोटो फिर्यादीचे परवानगी शिवाय त्याचे स्वताचे इंस्टाग्राम अंकाउटवर अपलोड केले आहे. तसेच त्या इस्टाग्राम अंकाउट वरील फोटो मध्ये इंग्रजीमध्ये I Love you तसेच त्याचे शेजारी बदामचे चिन्ह असे लिहले आहे. तसेच फिर्यादी अल्पवयीन असल्याचे त्याला माहीत असुन देखील फिर्यादीचे मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून वेळोवेळी फिर्यादीचे फोटो त्याचे स्वताचे इंस्टाग्राम अंकाउटवर फोटो अपलोड केले आहेत. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो उप नि गाडीलकर मो. ९८५०२२३२४२ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | देहुरोड ११६/२०२३ भादवि कलम ३८०,४५४,४५७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०४/०२/२०२३ रोजी १५.३० वा ते दि ०५.०२.२०२३ रोजी १९.४४ वाजताचे फ्लॅट नं १२ वरदविनायक अपार्टमेंट, विकासनगर, किवळे देहुरोड येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०८/०२/२०२३ रोजी१३.३१ वा. |
| फिर्यादी | :- | प्रसाद सदाशिव जाधव वय २९ वर्ष धंदानोकरी रा फ्लॅट नं १२ वरदविनायक अपार्टमेंट, विकासनगर, किवळे देहुरोड ता हवेली जि पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे राहत असलेल्या घराच्या दरवाजाचे लॉक कशाचेतरी साहयाने तोडुन घरामध्ये प्रवेश करुन लबाडीच्या इरादयाने स्वताचे आर्थिकफायदया करीता घरातील ७१,०००/- रु किं चे ४१ ग्रॅम वजनाचे वेगवेगळे प्रकारचे सोन्याचे दागिने व ४०००/- रु किंमतीचे चांदीचे दागीने असे एकुण ७५,०००/- रु किं माल घरफोडी करुन चोरी करुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जाधव ८१०८८५६५६५ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव एमआयडीसी ४१/२०२३ भादवी कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०७/०२/२०२३ रोजी २१/०० वा ते दि.०८/०२/२०२३ रोजीचे सकाळी ०८/०० वा चे सुमा जाधववाडी रोड नवलाकखउंब्रे ता.मावळ जि. पुणे यांचे मालकीचे खोलीचे बाहेर |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०८/०२/२०२३ रोजी २२.२४ वा |
| फिर्यादी | :- | अटलबिहारी पन्नालाल वर्मा, वय ३६ मोनं ८६६०५६६९२२ |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी वापरत असलेली २०,०००/- रु किं ची हों्डा स्पलेंडर प्रो ड्रम मो.सा.नंबर. एम.एच.१४/ई.ए.२६६५ ही सदर ठिकाणी लॉक करून पार्क केलेली असताना कोणीतरी आज्ञात चोरटयाने सदर गाडी चोरून नेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना/१३६८ जाधव मो न ९६३७४९६०६१ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चिखली ८९/२०२३भादवी कलम ३६३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०७/०२/२०२३ रोजी १८/३० वा ते ता. ०८/०२/२०२३ रोजी १९/०० वाजण्याचे दरम्यान रुपीनगर तळवडे पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०८ /०२/२०२३ रोजी२२/५०वाजता. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय ४० वर्षे |
| आरोपी | :- | अज्ञात आरोपी |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे पती हे त्यांचे मुळ गावी धुळे येथे व फिर्यादी यांचा मुलगा गोवा येथे गेले असताना फिर्यादी यांची मुलगी वय १६ वर्ष ०९ महिने १५ दिवस ही राहते घरी एकटीच असताना कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी आमीष दाखवुन,फुसलावुन फिर्यादीचे समंतीशिवाय व कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एम.डि.मुळीक पोलीस उपनिरीक्षक ७९७२५५८७४१ |

**०७.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ६८/२०२३भा.दं.वि.कलम४०६, ४१९,४२०, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम- ६७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/११/२०२२ रोजी पासुनते दि.२७/१२/२०२२ रोजी दरम्यान फिर्यादी यांचे राहते रुमवरुन |
| गुन्हा दाखल | :- | ०८/०२/२०२३ रोजी २०/१७ वा. |
| फिर्यादी | :- | कपिल प्रमोद भारंबे वयः- २७ वर्षे, धंदा.नोकरी, रा. रा. स्पेक्टरम हॉस्टेल,गुरुद्वाराचौक आकुर्डीचिंचवड, पुणे. मुळगाव - प्लॉट नं.३३, अयोध्यानगर,गणपती मंदिराजवळ जळगाव जि. जळगाव |
| आरोपी | :- | १)ग्रीननेचरवेल कंपनी विजयनगर सी २१ मॉलजवळ इंदौर मध्यप्रदेश<br>२)कस्टमर नामेः- प्रविण चंदानी राः- महाराणा प्रतापरोड, मानेकनगर, जुनी पनवेल, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपींनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन ग्रीननेचर वेल कंपनी विजयनगर सी २१ मॉल जवळ इंदौर मध्यप्रदेश यांनी ऑनलाईन माध्यमातुन फिर्यादी यांना व्यवसायाचे अमिष |

दाखवुन सदर व्यवसायात फिर्यादीला मेडीकल सॅम्पल पाठवुन ऑनलाईन ग्राहकाचे नाव देवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन ऑर्डर देवुन मेडीसीनकरिता ६,५७,२०० /- रुपये ऑनलाईन घेवुन फिर्यादीला ऑर्डर व मेडीसीन न देता फिर्यादीची डिलरशिप रद्द करुन आरोपीतांनी त्यांचे मोबाईल नबंर बंद करुन फिर्यादीला ऑर्डर व मेडीसीन न देता फिर्यादीची एकुण ६,५७,२००/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि श्री.खराडे सो ९६८९७२४७२९